प्रेसनोट

दिनांक २१/०५/२०२४

**श्रीमती अश्विनी अतुल कारंडे, वय - ४३ वर्षे, पद - अव्वल कारकुन, तहसीलदार कार्यालय कागल, ता. कागल, जि. कोल्हापूर वर्ग - ३, रा. लक्षदीप नगर, ४ नंबर बंगला, प्लॅट नंबर ३३९, रेल्वे स्टेशन समोर न्यु शाहुपूरी कोल्हापूर यांनी लाच मागणी करून ती लाच रक्कम स्विकारलेबाबत.....**

---

तक्रारदार यांचा गौण खनीज खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. त्यांनी गलगले, ता. कागल येथील गट नंबर २६८ ब मधील जमीन वाणीज्य वापराकरीता भाडे करारावर घेणार आहेत सदरची जमीन एन ए करणे आहे त्यासाठी तक्रारदार यांनी जमीन मालकांचे वतीने सदरची जमीन एन ए होणेबाबत अर्ज तहसील कार्यालय कागल येथे केला होता सदर जमीनचे एन ए. अर्जाबाबतचे काम तहसील कार्यालय कागल येथील कारंडे मॅडम ह्या पाहत असलेने तक्रारदार तहसिल कार्यालयात कागल येथे जावुन कारंडे मॅडम यांना भेटले असता तक्रारदार यांचेकडे कारंडे मॅडम यांनी जमीन एन.ए.करणेकरीता ८०,०००/- रूपयांची मागणी केली होती.

तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये तक्रारदार यांचे अर्जाप्रमाणे जमीन एन ए करणेकरीता तक्रारदार यांचेकडे कारंडे मॅडम यांनी ६०,०००/- रूपयांची मागणी करून त्यातील ३०,०००/- रूपये लागलीच घेवुन येण्यास सांगितल्याचे निषन्न झाले.

त्यानंतर लागलीच सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक **श्रीमती अश्विनी अतुल कारंडे, वय - ४३ वर्षे, पद - अव्वल कारकुन, तहसीलदार कार्यालय कागल, ता. कागल, जि.कोल्हापूर वर्ग - ०३** यांनी मागणी केलेल्या ६०,०००/- रूपयांपैकी ३०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले.

सदरबाबत **श्रीमती अश्विनी अतुल कारंडे, वय - ४३ वर्षे, पद - अव्वल कारकुन, तहसीलदार कार्यालय कागल, ता. कागल, जि.कोल्हापूर वर्ग - ०३, रा. लक्षदीप नगर, ४ नंबर बंगला, प्लॅट नंबर ३३९, रेल्वे स्टेशन समोर न्यु शाहुपूरी कोल्हापूर** यांचेविरूध्द कागल पोलीस ठाणे जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, डॉ.शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे तसेच श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, यांचे मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक श्रीमती आसमा मुल्ला, श्री प्रकाश भंडारे, सहायक पोलीस फौजदार, पो.हे.कॉ.श्री अजय चव्हाण, पो.ना. श्री सुधीर पाटील अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
**३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**
**५) व्हाट्स अप कमांक :- ७८७५३३३३३३.**

OFFICE OF THE DY.S.P. A.C.B. KOLHAPUR

सरदार नाळे
पोलीस उप अधीक्षक
ला.प्र.विभाग कोल्हापूर